| ५ | **शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी जन्मदिनांकांच्या नोंदीत बदल करण्यास परवानगी देणे.** |
|---|---|
| | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मधील नियम क्रमांक-११ (२) अन्वये जन्म तारखेची नोंद जन्म नोंदणी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र या आधारे नव्याने नोकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत करावयाची असते. सदर पुरावा न तपासता जर मुख्याध्यापकांनी एखाद्या कर्मचाऱ्याची जन्म तारीख चुकीची नोंदविलेली असेल तर ती दुरुस्त करुन घेणे ही कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे. परंतू पुराव्यानिशी जन्म तारखेची नोंद केलेली नसेल तर अशी चुकीची जन्म तारखेची नोंद केल्याबद्दल शाळांविरुध्द दंडात्मक कार्यवाही ही प्रकरणाची गुणवत्ता लक्षात घेऊन करण्यात येईल.<br>माध्यमिक शाळा संहिता मधील नियम ६७.६ जोडपत्र ५३ अन्वये व शिक्षण संचालनालयाकडील परिपत्रक क्रमांक-अमाशा/१५८६/१/२६२२०, दिनांक-१/१२/१९८६ अनुसार कर्मचारी सेवेत लागल्यानंतर शाळा प्रमुखाने मूळ सेवापुस्तकात कर्मचाऱ्याच्या जन्म दिनांकाची नोंद करताना त्याची पडताळणी मूळ शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावरुन किंवा एस.एस.सी. परीक्षा प्रमाणपत्रावरुन करुन ती नोंद कर्मचाऱ्याच्या मूळ सेवापुस्तकात ज्या रकान्यात ज्या कागदपत्राच्या आधारे केली त्या कागदपत्राचे नांव नमूद करुन त्यावर आपली दिनांकासह स्वाक्षरी केली पाहिजे अशी तरतूद आहे.<br>**उदा. "या जन्मदिनांकाची नोंद शाळा सोडल्याच्या इ.१२ वी च्या मूळ दाखल्यावरुन घेण्यात आली आहे."**<br>तसेच शिक्षकांना जन्मतारखेमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास याबाबत आवश्यक ते पुरावे सादर करुन जन्मतारखेच्या चुकीच्या नोंदी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांच्या कालावधीत असा प्रस्ताव शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ या कार्यालयास सादर करुन या कार्यालयाकडून दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. मात्र जर जन्म तारखेची नोंद शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रानुसार केलेली असेल तर जन्म नोंदणी दाखल्याचे आधारे ती दुरुस्त करण्यास परवानगी दिली जाणार नाही. |
| | **प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे** |

| | |
|---|---|
| १ | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा जन्मदिनांक बदलाचा प्रस्ताव मुख्याध्यापकांमार्फत तर मुख्याध्यापक पदी कार्यरत असणाऱ्या शिक्षकाचा प्रस्ताव संस्थाप्रमुखामार्फत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचेकडे त्यांच्या शिफारस पत्रासह सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | प्रस्तावासोबत संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे मूळ सेवापुस्तक प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ३ | मुख्याध्यापकांनी एखाद्या कर्मचाऱ्याची यापूर्वी चुकीची नोंदलेली जन्मदिनांक ज्या मूळ कागदपत्रावरुन नोंदविलेली असेल त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ४ | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याची चुकीची नोंदलेली जन्मदिनांक ज्या मूळ कागदपत्रांच्या पुराव्यावरुन दुरुस्त करुन घ्यावयाची आहे त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ५ | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मूळ सेवापुस्तकात कर्मचाऱ्यांची जन्मदिनांक चुकीची का नोंदविण्यात आली ? याबाबत मुख्याध्यापकांचा लेखी खुलासा प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.<br>तर मुख्याध्यापकांच्या बाबतीत मूळ सेवापुस्तकात कर्मचाऱ्यांची जन्मदिनांक चुकीची का नोंदविण्यात आली ? याबाबत संस्था अध्यक्ष/सचिव यांचा लेखी खुलासा प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |